# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ८१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.०४ नोव्हेंबर, २०१५ दुपारी ०२:०० वा.

व्यवस्थापन परिषदेची ८१ वी बैठक बुधवार, दि.०४ नोव्हेंबर, २०१५ रोजी दुपारी ०२:०० वाजता व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ३) | श्री. पाटील बी. पी., परीक्षा नियंत्रक तथा प्रभारी वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| ४) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

### स्वागत:

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

### अनुपस्थिती:

मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी या बैठकीस दूरध्वनीद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून त्यास मान्यता देण्यात आली. मा. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] २२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

ठराव : २२ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २९ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

ठराव : महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

[ ०३ ] **बोनाफाईड सर्टिफिकेटच्या शुल्कात वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तूत विद्यापीठ परिसरातील संकुलात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वेगवेगळया कामासाठी बोनाफाईड सर्टिफिकेटची सातत्याने गरज लागत असल्याने गरजू विद्यार्थी त्याची मागणी प्रस्तूत विद्यापीठात पी. जी. प्रवेश विभागाकडे करतात. सदर विद्यार्थ्यांच्या मागणीप्रमाणे बोनाफाईड सर्टिफिकेट देणेसाठी रक्कम रु.५/- इतके शुल्क संबंधीत विद्यार्थ्याकडून आत्तापर्यंत आकारले जात आहे. परंतू सदरचे आकारण्यात येत असलेले शुल्क हे अन्य विद्यापीठाकडून आकारण्यात येत असलेल्या शुल्कापेक्षा खुपच कमी असल्यामूळे त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

अन्य विद्यापीठाकडून आकारण्यात येत असलेल्या बोनाफाईड सर्टिफिकेटच्या शुल्काची माहिती दूरध्वनीवरुन प्राप्त करुन घेतला असून ती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | बोनाफाईड शुल्काची रक्कम |
|---|---|---|
| १) | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | रु.१५/- |
| २) | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे | रु.१००/- |
| ३) | मुंबई विद्यापीठ, मुंबई | रु.२५/- |

सबब, वरीलप्रमाणे अन्य विद्यापीठाकडून आकारण्यात येत असलेल्या शुल्काची रक्कम विचारात घेतली असता प्रस्तूत विद्यापीठाकडून आकारण्यात येत असलेल्या बोनाफाईड सर्टिफिकेटचे शुल्क खूपच कमी असल्याने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २८(फ) मधील तरतूदीनुसार त्यामध्ये वाढ करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **बोनाफाईड सर्टिफिकेटच्या शुल्कात रु.५/- वरुन रु.२५/- इतकी वाढ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०४ ] परीक्षा विभागातील कामासाठी येणारे प्राध्यापक तसेच इतर कामासाठी येणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, मानधन व उपस्थितीचे प्रमाणपत्राबाबत मा. कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: पुर्नमूल्यांकन, पेपर सेटिंग, परीक्षा प्रमाद, मध्यवर्ती मूल्यमापन केंद्र येथे उत्तरपत्रिका तपासणी प्रात्यक्षिक पेपर सेटिंग परीक्षा विभागात येणारे प्राध्यापक तसेच इतर विविध परीक्षा विभागांशी निगडीत कामासाठी येणाऱ्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, मानधन व रिक्षा भाडे इत्यादी देयके रक्कम रु.१,५००/- (अक्षरी एक हजार पाचशे फक्त) पर्यंत आदा करण्यासाठी कक्ष अधिकारी यांच्या मान्यतेने / तपासून अंतिम मान्यतेसाठी वित्त व लेखा विभागाकडे पाठविण्याचे अधिकार कक्ष अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

तसेच संबंधीत प्राध्यापकांना उपस्थितीचे प्रमाणपत्र हे कक्ष अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देण्याचे अधिकार कक्ष अधिकारी यांना देण्यात आले आहेत.

सबब, वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव: परीक्षा विभागातील कामासाठी येणारे प्राध्यापक तसेच इतर कामासाठी येणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रवास भत्ता, दैनिक भत्ता, मानधन व उपस्थितीचे प्रमाणपत्राबाबत मा. कुलगुरु यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

[ ०५ ] **पुर्नमूल्यांकन (Revaluation) छायांकित प्रत (Photocopy) चे दर वाढविणे व GRC करणेसाठी मानधन देणेबाबतची परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: पुर्नमूल्यांकन करणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनामध्ये रिक्षा चार्जेस व स्थानिक भत्ता यामध्ये वाढ केलेली आहे.

तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याही परीक्षेच्या कामामधील मानधनामध्ये वाढ केलेली आहे. छायांकित प्रतीच्या दरामध्ये वाढ झालेली आहे.

GRC करण्यासाठी त्या विषयातील प्राध्यापकांना बोलवावे लागते. संबंधीत विषयातील प्राध्यापक हे GRC करण्यासाठी मानधन नसल्याने तयार होत नाहीत. त्यामूळे GRC करणेसाठी मानधन देणे योग्य वाटते.

वरील सर्व परिस्थितीचा विचार करता पुर्नमुल्यांकन, छायांकित प्रती यांचे दरामध्ये वाढ करणे व GRC करणेसाठी मानधन देणे गरजेचे वाटते. सद्यस्थितीत खालीलप्रमाणे वरील कामाचे दर / मानधन आहेत.

| अ.क्र. | वर्णन | सध्याचे दर | सुधारीत करावयाचे दर |
|---|---|---|---|
| १) | पुर्नमूल्यांकन (Revaluation) | रु.५००/ | |
| २) | छायांकित प्रत (Photocopy) | रु.२००/- | |
| ३) | GRC करणेसाठी | नाही | |

तरी पुर्नमूल्यांकन व छायांकित प्रतीच्या दरामध्ये वाढ करणे व GRC करणेसाठी मानधन देणेची बाब परीक्षा मंडळाच्या दि.०५/१०/२०१५ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| | |
|---|---|
| ठराव: | १. अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी फेरतपासणी व उत्तरपत्रिका छायांकित प्रत यासाठी कोणतीही वाढ करण्यात येवू नये.<br>२. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी (Engg., Pharmacy, Architecture, M.S.W., Law, Education M. B. A., M. C. A., Computer Science, I. T.) उत्तरपत्रिका छायांकित प्रत (Photocopy) साठी रु.३००/- प्रति पेपर व फेरतपासणी (Revaluation) साठी रु.७५०/- प्रति पेपर असे दर आकारावे.<br>३. त्याचप्रमाणे GRC साठी रु.१०/- प्रति पेपर व (Minimum Remuneration for GRC) कमीत कमी रु.२००/- पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी परीक्षकांना देण्यात यावेत.<br>४. वरीलप्रमाणे मानधन देण्याबाबतची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करावी असे सर्वानुमते ठरले. |

पुर्नमूल्यांकन (Revaluation) छायांकित प्रत (Photocopy) चे दर वाढविणे व GRC करणेसाठी मानधन देण्याबाबतची परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **परीक्षा मंडळाने पुर्नमूल्यांकन (Revaluation) छायांकित प्रत (Photocopy) चे दर वाढविणे व GRC करणेसाठी मानधन देण्याबाबत केलेल्या शिफारशींपैकी अ.क्र.१ व २ ची शिफारस सर्वानुमते स्विकारण्यात आली व अ.क्र. ३ व ४ सर्वानुमते अमान्य करण्यात आले.**

[ ०६ ] परीक्षा मंडळाने परीक्षा संदर्भातील कामाच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

(टिपणी: परीक्षा मंडळाची दि.०५/१०/२०१५ च्या बैठकीतील ठराव क्र.५ नुसार परीक्षा संदर्भातील कामाचे मानधन वाढ करण्याबाबत नेमलेल्या समितीच्या शिफारशी स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आलेली आहे.

सबब, मानधनात वाढ करण्यासाठी नेमलेल्या समितीने दि.२१/०९/२०१५ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारशी जोडलेल्या आहेत. त्यामूळे परीक्षा मंडळाने परीक्षा संदर्भात कामाच्या मानधनात वाढ करण्याबाबत केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: परीक्षा मंडळाने परीक्षा संदर्भातील कामाच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत केलेली खालीलप्रमाणे शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| S. N. | Details | Current rate | Revised rate |
|---|---|---|---|
| 1 | Senior Supervisor Per Session | 100/- | 125/- |
| 2 | Junior Supervisor Per Session | 60/- | 75/- |
| 3 | Clerk Per Session | 50/- | 75/- |
| 4 | Attendant Cum Waterman Per Session | 35/- | 40/- |
| 5 | Bellman / Waterman boys per Session | 35/- | 40/- |
| 6 | Night Watchman / Scavenger per day | 35/- | 40/- |
| | Confidentional Allowance / Day | | |
| 7 | Superintendant / Head Clerk | 70/- | 80/- |
| 8 | Clerk / Senior Clerk | 50/- | 75/- |
| 9 | Peon | 40/- | 50/- |
| 10 | Auto Charges for Answer books Submission to Cap | 80/- | 100/- |

Remuneration to Moderators

| S.N. | For Answer Books of 100 Marks | For 100 Marks | For 50 Marks | Revised Rate 50 Marks |
|---|---|---|---|---|
| 1 | Total No of Answer Book up to 50 | 125/- | 62.50/- | 65/- |
| 2 | Total No. of Asnwer book more than Answer books up to 50 to 100 Answer books | 250/- | 125/- | --- |
| 3 | Total No. of 101 Answer books & up to 150 Answer books | 375/- | 187.50/- | 190/- |
| 4 | Total No. of 151 Answer books & up to 250 Answer books | 500/- | 250/- | --- |
| 5 | For more than 250 Answer book up to 500 | 625/- | 312.50/- | 315/- |
| 6 | Maximum (501 Answer books & above) | 700/- | 315/- | 400/- |

Remuneration to Central Assessment to Center for Staff:

| S. N. | Staff | Rate | Revised Rate |
|---|---|---|---|
| 1 | Director | 400/- | 450/- |
| 2 | Cap Incharge | 400/- | |
| 3 | Clerk | 100/- | 125/- |
| 4 | Peon | 70/- | 100/- |
| 5 | Security Guard | 125/- | 125/- |

Remuneration to Flying Squad Members

1. Rs.150/- for one Session of one day + TADA as per rules.

स्क्रुटिनी प्रति पेपर ४० पैसे

स्टेशनरी प्रति पेपर ५ पैसे

ME Dissertation Viva Voce Internal & External Examiners Rs.२००/- (१०० Each Examiner)

[ ०७ ] महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.अग्रिम-२०१२ /प्र. क्र.३२ / १२/विनियम, दि.१८ ऑक्टोबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार दिवाळी अग्रीम रु.५,०००/- देण्यात येते. परंतु सध्याची महागाई विचारात घेता रु.५,०००/- च्या व्यतिरिक्त रु.१०,०००/- दिवाळी अग्रीम सर्व प्रशासकीय सेवकांना (गट-अ ते गट-ड) विद्यापीठ फंडातून देण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: श्री. पी. टी. रणदिवे, अध्यक्ष, सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटना, सोलापूर यांच्या दि.०६/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासन, वित्त विभागाच्या दि.१८ ऑक्टोबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार दि.०१ जानेवारी, २००६ पासून सुधारीत करण्यात आलेल्या वेतन संरचनेनुसार ज्या अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे ग्रेड वेतन रु.४,८००/- पेक्षा अधिक नाही अशा अराजपत्रित राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना रु.५,०००/- सण अग्रीम अनुज्ञेय आहे. परंतु सध्या बाजारपेठेतील जीवनावश्यक वस्तूंची महागाई विचारात घेवून दिवाळी सणाकरीता रु.५,०००/- च्या व्यतिरिक्त रु.१०,०००/- अग्रीम विद्यापीठ फंडातून सर्व प्रशासकीय सेवकांना (गट- अ ते गट- ड) देण्याबाबत व त्याची कपाट समान दहा हप्त्यात करण्याबाबत विनंती केली आहे.

सबब, महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.अग्रिम-२०१२/ प्र. क्र.३२ / १२ / विनियम, दि.१८ ऑक्टोबर, २०१२ च्या शासन निर्णयानुसार दिवाळी अग्रीम रु.५,०००/- देण्यात येते. परंतु सध्याची महागाई विचारात घेता रु.५,०००/- च्या व्यतिरिक्त रु.१०,०००/- दिवाळी अग्रीम सर्व प्रशासकीय सेवकांना (गट-अ ते गट-ड) विद्यापीठ फंडातून देण्याची बाब विचारार्थ.

ठराव: ग्रेड वेतन रु.४,८००/- पेक्षा अधिक नाही अशा कर्मचाऱ्यांना दि.२६/१०/२०१५ च्या शासन निर्णयानुसार सणासाठी रु.१०,०००/- इतकी अग्रीम रक्कम घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे ग्रेड वेतन रु.४,८००/- पेक्षा अधिक नाही अशा कर्मचाऱ्यांना या रु.१०,०००/- व्यतिरिक्त विद्यापीठ फंडातून रु.५,०००/- अग्रीम देण्यास व त्याची परतफेड समान पाच हप्त्यात करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ ०८ ] सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखे, लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या दि.२८/११/२०१५ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यात येणार आहे.

सबब, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखे, लेखापरीक्षण अहवाल अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे वार्षिक लेखे, लेखापरीक्षण अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्राचार्य श्री. आर. वाय पाटील यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

मा. कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

[ ९(१) ] सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित सर्व महाविद्यालयातून इंग्रजी विषय घेवून एम. ए. भाग १ व २ मध्ये नियमित व बहिस्थ विद्यार्थी / विद्यार्थीनी मधून सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "स्व. निशा कारखानीस सुवर्णपदक" देण्यास व त्याकरिता रु.१,००,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: श्री. एम. ए. कारखानीस, चिंतामणी सदन, सुखसागर नगर, कात्रज, पुणे यांनी सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित सर्व महाविद्यालयातून इंग्रजी विषय घेवून एम. ए. भाग १ व २ मध्ये नियमित व बहिस्थ विद्यार्थी / विद्यार्थीनीमधून गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "स्व. निशा कारखानीस सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्यासाठी दि.०९/१०/२०१५ रोजीच्या पत्रासोबत रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) ची देणगी विद्यापीठास दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला आहे.

व्यवस्थापन परिषेदची बैठक तारीख दरम्यानच्या कालावधीमध्ये निश्चित न झाल्यामूळे श्री. एम. ए. कारखानीस यांच्याकडून सुवर्णपदक देण्यासंदर्भात विद्यापीठास प्राप्त झालेला रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) चा धनादेश स्विकारुन सुवर्णपदक देण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागास जमा करण्यात आला आहे.

सबब, मा. कुलगुरुमहोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव: श्री. एम. ए. कारखानीस यांनी दिलेली रु.१,००,०००/- देणगी स्विकारण्यास व त्याप्रित्यर्थ सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातून इंग्रजी विषय घेवून एम. ए. भाग १ व २ मध्ये नियमित व बहिस्थ विद्यार्थी / विद्यार्थीनी मधून सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "स्व. निशा कारखानीस सुवर्णपदक" देण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. तसेच या सुवर्णपदकासाठी यापूर्वी तयार केलेली एकत्रित नियमावली लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

[ ९(२) ] **सोलापूर विद्यापीठातील संकुले व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित एम. ए. (भाग-१ व २) मधील सर्व भाषा विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस प्रत्येक वर्षी "श्री. बी. के. रविगुरुजी सुवर्णपदक" देण्यास व त्याकरिता रु.१,००,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: डॉ.राजश्री राजशेखर रवि, एम- १, जय जलाराम नगर, रवि मॅटर्निटी होम, व्दारकाधीश मंदिराजवळ, विजापूर रोड, सोलापूर यांनी सोलापूर विद्यापीठातील संकुले व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित एम. ए. (भाग-१ व २) मधील सर्व भाषा विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस प्रत्येक वर्षी **"श्री. बी. के. रविगुरुजी सुवर्णपदक"** या नावाने एकविसावे सुवर्णपदक देण्यासाठी दि.२१/१०/२०१५ रोजीच्या पत्रासोत रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख ) ची देणगी विद्यापीठास दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला आहे.

व्यवस्थापन परिषदेची बैठक होण्यास काही अवधी असल्याने डॉ. राजश्री राजशेखर रवि यांच्याकडून सुवर्णपदक देण्यासंदर्भात विद्यापीठास प्राप्त झालेला रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख) चा धनादेश स्विकारण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्यात आला आहे.

सबब, मा. कुलगुरुमहोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव: **डॉ. राजश्री राजशेखर रवि यांनी दिलेली रु.१,००,०००/- देणगी स्विकारण्यास व त्याप्रित्यर्थ सोलापूर विद्यापीठातील संकुले व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित एम. ए. (भाग-१ व २) मधील सर्व भाषा विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस प्रत्येक वर्षी "श्री. बी. के. रविगुरुजी सुवर्णपदक" देण्यास व त्याकरिता म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. तसेच या सुवर्णपदकासाठी यापूर्वी तयार केलेली एकत्रित नियमावली लागू करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ९(३) ] भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांची बयाणा रक्कम जप्त करण्यास व त्यांचे नाव काळ्या यादीत समावेश करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: सन २०१५-१६ या वर्षाकरिता विद्यापीठाकडील संकुले व प्रशासकीय विभागासाठी लागणारी लेखन सामुग्रीसाठी खरेदीकरिता वार्षिक दरकरार करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार (१) मे. विक्रांत पेपर्स ॲन्ड स्टेशनरी, सोलापूर (२) मे. ताटीज एंटरप्रायझेस, सोलापूर व (३) मे. भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर या तीन फर्मने निविदा सादर केलेल्या आहेत. सादर करण्यात आलेल्या निविदाधारकास दि.१०/०९/२०१५ रोजीच्या पत्राद्वारे स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्याबाबत तीनही फर्मला कळविण्यात आलेले होते. त्यानुसार मे. भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर ही फर्म वगळता उर्वरित दोन फर्मने करारनामा पूर्ण केलेला आहे. याबाबत मे. भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांना पुनश्च: दि.२८/०९/२०१५ व दि.१७/१०/२०१५ रोजीच्या कार्यालयीन लेखी पत्राद्वारे करारनामा तात्काळ करण्याबाबत व करारनामा न केल्यास त्यांना आपण भरलेली बयाणा रक्कम रु.१६,०००/- जप्त करुन आपले नाव काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल असे कळवून ही ते अद्याप कसलाही प्रतिसाद दिलेला नाही.

मे. भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांचे निविदेतील एकूण वस्तूपैकी ६२ वस्तूचे दर न्यूनतम आहेत. सदर फर्म करारनामा करण्याबाबत कसलाच प्रतिसाद देत नसल्याने आवश्यक लेखनसामुग्री खरेदी करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्यामूळे खालीलप्रमाणे कार्यवाही करणे उचित वाटते.

१) मे. भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांनी निविदेसोबत भरलेली बयाणा रक्कम रु.१६,०००/- जप्त करण्यास व सदर फर्मचे नाव काळया यादीत समावेश करण्याबाबत.

२) उपरोक्त ६२ वस्तूची संकुलास / प्रशासकीय विभागास तातडीने आवश्यकता असल्याने निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यत आवश्यकतेप्रमाणे दरपत्रके मागवून खरेदी करण्यास मान्यता असावी.

३) उपरोक्त ६२ वस्तूसाठी निविदा मागविण्यास मान्यता असावी.

सबब, उपरोक्त बाबी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **मे. भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांना सदरचे काम न करण्याबाबत काही अडचणी आहेत का याबाबत रजिस्टर्ड पोस्टाने पत्र पाठवावे व त्यांच्याकडून यासंदर्भात कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्यास तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे. भक्ती मल्टी सर्व्हिसेस, सोलापूर यांच्या नंतर न्यूनतम दर असलेल्या (L२) फर्मला पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ९(४) ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा मराठी भाषेतील (पुस्तक व सी.डी. स्वरुपात) तयार केलेला १० वा वार्षिक अहवाल विचारार्थ.**

(टिपणी: महराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २८ (गग) नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल यांच्यावर विचार करणे व ते स्विकारणे आणि ते अधिसभेकडे पाठवणे."

सबब, सन २०१३-१४ चा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील समितीचे गठन केलेले होते.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. ए. ए. शेख | अध्यक्ष |
| २) | डॉ. श्रीकांत येळेगावकर | सदस्य |
| ३) | डॉ. डी. जी. कदम | सदस्य |
| ४) | डॉ. सुहास पुजारी | सदस्य |
| ५) | डॉ. आर. एस. मेंते | सदस्य |
| ६) | श्रीमती ए. एस. साळुंखे | सदस्य - सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासकीय विभागाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करुन वेळोवेळी बैठका घेवून सदरचा मराठी भाषेतील अहवाल (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार करुन व्यवस्थापन परिषदेकडे मान्यता देण्याबाबत कार्यवाहीसाठी शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर सदरचा अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १०४(१) व (२) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम १०४(१) | The Annual Report of the University shall be prepared and published by the University and such report as approved by the Management Council shall be submitted to the Chancellore, State government and Senate. The Senate may consider the Annual Report in its meeting and may make recommendations as it deems fit. The Management Council shall take appropriate action on the recommendations of the Senate and report the action taken to the Senate. |

| | |
|---|---|
| कलम १०४(२) | Namley-(z) The State Government shall cause the annual report of the University, recived by it, to be laid before each House of the State Legislature. |

सबब, २०१३-१४ साठीचा वरील समितीने तयार केलेला १० वा वार्षिक अहवाल विचारार्थ).

ठराव: **वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने तयार केलेला सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा १० वा वार्षिक अहवाल दुरुस्तीसह स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[ ९(५) ] सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा मराठी भाषेतील (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार केलेला १० वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १०४ मधील तरतूदीनुसार, सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा १० वा वार्षिक अहवाल मराठी भाषेत तयार करण्यात आला असून, सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.०४ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

सदरचा सन २०१३-१४ चा १० वा वार्षिक अहवाल आगामी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत सादर करावा लागणार आहे.

सबब, सन २०१३-१४ चा १० वार्षिक अहवाल अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशनाबाबत विचारार्थ).

**ठराव: सोलापूर विद्यापीठाचा सन २०१३-१४ चा मराठी भाषेतील (पुस्तक व सी. डी. स्वरुपात) तयार केलेला १० वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ९(६) ] दि.१७/१०/२०१५ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांतास वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.१७/१०/२०१५ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statutes No.S.३२४ नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, त्यास दि.२९/१०/२०१५ रोजीच्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस केली आहे.

सबब, दि.१७/१०/२०१५ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांतास वित्त व लेखा समितीने केलेली मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **दि.१७/१०/२०१५ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने केलेल्या मान्यतेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ९(७) ] भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम.ई. (मेकॅनिकल- मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी:-मा.सचिव, श्री.भगवंत एज्युकेशन ॲन्ड रिसर्च चॅरिटेबल ट्रस्ट, बार्शी यांचेकडून संस्थेचे संचलित भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम.ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला होता.

| संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.भगवंत एज्युकेशन ॲन्ड रिसर्च चॅरिटेबल ट्रस्ट, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर. | भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी, ता.बार्शी, जि.सोलापूर. | शै.वर्ष २०१६-१७ पासून | एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरिंग इंजिनिअरींग) | कायम विनाअनुदानित |

भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०१३-१४ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर ए. आय. सी. टी. ई. नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची मान्यता मिळालेली होती. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीच्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शै.वर्ष २०१३-१४ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती.

परंतु एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) या अभ्यासक्रमास विद्यार्थी उपलब्ध होत नसल्यामुळे संस्थेने शै.वर्ष २०१६-१७ पासून सदर अभ्यासक्रम बंद करीत असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे) मधील तरतूदींची छायांकित प्रत व तद्अनुषंगिक परिनियम ३७४ ते ३८० ची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

महाविद्यालय, विषय/विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ९२(३) अन्वये खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. प्राचार्य, डॉ. एस.ए. हलकुडे (अध्यक्ष)
२. प्राचार्य, डॉ. एम.एस. पवार (सदस्य)
३. श्री. पी.पी. मित्रगोत्री (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देऊन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने महाविद्यालयातील एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए. आय. सी. टी. ई. नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशक्षमता / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र ए. आय. सी. टी. ई. कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे. त्यास्तव भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्या परिषदेची व्यवस्थापन परिषदेला शिफारस असणे आवश्यक आहे.

तथापि, विद्या परिषदेची बैठक दि.१३/०८/२०१५ रोजी संपन्न झाली असून, नजीकच्या काळात लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्याने व महाविद्यालयातील अभ्यासक्रम बंद करण्यासंदर्भातची पुढील कार्यवाही विहित वेळेत होण्यास्तव भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम. ई. (मेकॅनिकल मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै. वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **भगवंत इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, बार्शी या महाविद्यालयातील एम.ई. (मेकॅनिकल- मॅन्युफॅक्चरींग इंजिनिअरींग) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम शै.वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ९(८) ] **शै.वर्ष २०१४-१५ मध्ये प्रि.के.पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाने बी. बी. ए. भाग १ या अभ्यासक्रमाकरीता मुळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने सदर महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रिं.के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयातील बी.बी.ए.भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाकरीता नियुक्त केलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालातील अटीमधील अट क्र. ६ मध्ये खालील बाबी नमुद केल्या आहेत.

- **शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये बी.बी.ए.भाग १ मध्ये ६६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे. अतिरिक्त ६ विद्यार्थ्यांची विद्यापीठाकडून परवानगी घेतलेली नाही असे दिसते. त्यासाठी विद्यापीठाने विद्यापीठ नियमाप्रमाणे कारवाई करावी.**

उक्त बाब अवलोकनी घेता, शै.वर्ष २०१४-१५ मध्ये प्रि.के.पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाने त्यांच्याकडील बी.बी.ए.भाग १ या अभ्यासक्रमाकरीता त्यांच्या प्रवेश क्षमता ६० असताना ६६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. म्हणजेच अतिरिक्त ६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे. असे नमुद केले असून त्याकरीता विद्यापीठाने विद्यापीठ नियमाप्रमाणे कारवाई करावी असे नमूद केले आहे.

सदरबाबत कार्यालयीन निवेदन खालीलप्रमाणे :-

१. प्रिं.के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयातील बी.बी.ए.भाग १ या अभ्यासक्रमाकरीता प्रवेश क्षमता ६० आहे.
२. महाविद्यालयाकडून शै.वर्ष २०१४-१५ च्या बी.बी.ए.भाग १ या अभ्यसक्रमाची प्रवेशित विद्यार्थ्यांची प्राप्त माहिती पाहता महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता न घेता अतिरिक्त ६ विद्यार्थ्यना प्रवेश दिल्याचे दिसून येते.

वास्तविक पाहता कोणत्याही महाविद्यालयाला त्यांच्याकडील कोणत्याही अभ्यसक्रमाला मान्यताप्राप्त प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यंना प्रवेश देता येत नाही. जर एखाद्या अभ्यासक्रमांला मुळ प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचे असेल तर सदरबाबत विद्यापीठाकडून अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेकरीता मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि सदर महाविद्यालयाने विद्यापीठाची मान्यता न घेता अतिरिक्त ६ विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे दिसून येते.

जर एखाद्या महाविद्यालयाने त्यांच्याकडील कोणत्याही अभ्यासक्रमाला मुळ प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यना प्रवेश दिला तर दंडक ४४ अन्वये संबधित महाविद्यालयाला आर्थिक दंड करण्याची तरतूद आहे.(सोबत दंडकाची छायांकित प्रत जोडलेली आहे)

उक्त बाबी संदर्भात दंडक ४४ (iii) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे :-

A fine not less than the amount of annual tution fees and not more than ten times the annual tution fees per student, for students admitted in excess of the permitted strength for course/division or for admitting students in violation of the rules of admission.

सदरबाबत प्रस्तुत कार्यालयाच्या दि. १७/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयाला खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि महाविद्यालयाने सदरबाबत कोणताही खुलासा सादर केलेला नाही.

सबब, शै.वर्ष २०१४-१५ मध्ये प्रि.के.पी. मंगळवेढेकर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाने बी.बी.ए.भाग १ या अभ्यासक्रमाकरीता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने सदर महाविद्यालयावर दंडात्मक कारवाई करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **शै. वर्ष २०१४-१५ मध्ये प्रिं. के. पी. मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट ॲन्ड रिसर्च, सोलापूर या महाविद्यालयाने बी. बी. ए. भाग १ या अभ्यासक्रमाकरिता मूळ प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने सदर महाविद्यालयास दंडक ४४(iii) प्रमाणे दहापट दंड आकारण्यास व महाविद्यालयाचे संलग्निकरण का काढून घेवू नये असा खुलासा विचारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ९(९) ] **डी. पी. बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयातील एम.एड. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयानी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: मा प्राचार्य, डी.पी.बी.दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर यांचेकडून महाविद्यालयातील एम.एड. हा अभ्यासक्रम शै.वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

| संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | बंद करावयाचा अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| **डि.ए.व्ही.कॉलेज ट्रस्ट ॲन्ड मॅनेजमेंट कमिटी, नवी दिल्ली** | **डी.पी.बी.दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.** | **शै.वर्ष २०१६-१७ पासून** | **एम. एड.** | **कायम विनाअनुदानित** |

उक्त संस्थेच्या संचलित डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयातील एम.एड. या अभ्यासक्रमास शै.वर्ष २००९-१० पासून कायम विनाअनुदानित तत्वावर एन. सी. टी. ई. भोपाळ यांची मान्यता मिळालेली होती. सदर मान्यतेच्या अनुषंगाने डी. पी. बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयातील एम.एड.या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम संलग्निकरणास शै.वर्ष २००९-१० पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आलेली होती. सदर महाविद्यालयातील एम. एड. या अभ्यासक्रमास शै.वर्ष २०१५-१६ पर्यंत मान्यता आहे. परंतु उक्त महाविद्यालयातील एम. एड. या अभ्यासक्रमास घटत जाणारी विद्यार्थी संख्या व मिळणाऱ्या शुल्कातून खर्च भागवणे कठीण असल्याचे नूमद करुन महाविद्यालयाने शै.वर्ष २०१६-१७ पासून एम. एड. हा अभ्यासक्रम बंद करण्यास्तव रितसर शुल्क भरून प्रस्ताव सादर केलेला आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, कलम ९२ (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे) मधील तरतूदींची छायांकित प्रत व तद्नुषंगिक परिनियम ३७४ ते ३८० ची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे महाविद्यालयाकडून एम. एड. अभ्यासक्रम बंद करण्याबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावासंदर्भात संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यास्तव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (३) अन्वये खालील स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१. डॉ. ए. एम. रंगरेज (अध्यक्ष)

२. प्राचार्य डॉ. एस. एस. गणापूर (सदस्य)

३. प्रा. डॉ. ए. ए. इनामदार (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवुन सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने शै.वर्ष २०१६-१७ पासून महाविद्यालयातील एम. एड. हा अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४, कलम ९२(५) अन्वये कोणतेही महाविद्यालय / अभ्यासक्रम बंद करावयाचे स्थानिक चौकशी समितीने केलेल्या शिफारशीना अनुसरुन प्रथम विद्या परिषदेकडून व्यवस्थापन परिषदेला शिफारस असणे आवश्यक आहे व व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्र शासनाकडे मान्यतेकरीता सादर करावे लागते तद्‌नंतर शासनाची मान्यता मिळाल्यानंतर पुन:श्च विद्या परिषदेसमोर विषय ठेवुन संबधित महाविद्यालयातील अभ्यासक्रम बंद करावयास मान्यता दिली जाते. तथापि, विद्या परिषदेची बैठक दि.१४/०८/२०१५ रोजी संपन्न झालेली असल्यामुळे दरम्यानच्या काळामध्ये विद्यापरिषदेची बैठक आयोजित होण्याची शक्यता नसल्यामुळे व उपरोक्त महाविद्यालयातील एम. एड. या अभ्यासक्रमाची बंदची कार्यवाही विहीत मुदतीत पूर्ण करणे आवश्यक असल्यामुळे मा.कुलगुरुमहोदयांनी म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने व्यवस्थापन परिषदेला शिफारस केलेली आहे.

सबब, डी. पी. बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयातील एम. एड. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्याबाबत विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयानी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **डी. पी. बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयातील एम.एड. हा अभ्यासक्रम शै. वर्ष २०१६-१७ पासून बंद करण्याबाबत विद्यापरिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयानी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ९(१०) ] शिक्षणशास्त्र विद्याशोखकरीता शै. वर्ष २०१५-१६ करीता तयार करण्यात आलेला सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तूत कार्यालयाकडून दि.२४/०३/२०१५ रोजीचे परिपत्रक क्र.सोविसो/मविविमं/संलग्नता/१२७०७ अन्वये शै. वर्ष २०१५-१६ चे सत्र आरंभ व सत्र समाप्तीचे खालीलप्रमाणे तारखा सर्व संलग्नित महाविद्यालय तसेच विद्यापीठातील सर्व संकुलांना कळविण्यात आलेले होते.

**तक्ता अ**

| विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|
| | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिक शास्त्रे, (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | १५ जून, २०१५ | ३० ऑक्टोबर, २०१५ | २६ नोव्हेंबर, २०१५ | १ मे, २०१६ |
| अभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम एम.बी.ए., एम. एस. डब्लयू इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | १ जुलै, २०१५ | २९ नोव्हेंबर, २०१५ | १ जानेवारी, २०१६ | २३ मे, २०१६ |
| विधी (पदवी व पदव्युत्तर) | १ जुलै, २०१५ | ४ नोव्हेंबर, २०१५ | १ डिसेंबर, २०१५ | १७ मे, २०१६ |
| शिक्षण (बी.एड., बी.पीएड, एम.एड, एम.पीएड, एम.ए. एज्युकेशन इ. पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | १ जुले, २०१५ | ४ नोव्हेंबर, २०१५ | १ डिसेंबर, २०१५ | १७ मे, २०१६ |

**टिप: सत्रारंभ व सत्रसमाप्तीच्या तारखांमध्ये महाविद्यालयास बदल करता येणार नाही.**

सत्रारंभाच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी सत्रारंभास सुरुवात करावी. सत्र समाप्तीच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या अगोदरचा दिवस सत्र समाप्तीचा दिवस राहील.

सर्व संलग्नित महाविद्यालयामध्ये उपरोक्तप्रमाणे देण्यात आलेल्या तारखाप्रमाणे सुरु आहेत. तथापि, शै. वर्ष २०१५-१६ पासून एन. सी.टी.ई. रेग्युलेशन २०१४ लागू झालेले असल्यामूळे शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामूळे शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र अभ्याक्रमांचे प्रवेश उशिरा झाल्यामूळे उपरोक्त पत्रान्वये डॉ. एस. एस गणापूर, डॉ. एस. बी. क्षिरसागर, डॉ. आर. एस. हिरेमठ व डॉ. ए. एम. रंगरेज यांनी शिक्षणशास्त्र विद्याशाखेअंतर्गत येणाऱ्या बी. एड, बी.पीएड, एम.एड, एम.पीएड, एम. ए. एज्युकेशन या अभ्यासक्रमासाठी खालीलप्रमाणे सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा तयार करुन त्याप्रमाणे सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा सर्व संलग्नित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना कळविणेबाबत कळविलेले आहे. शिक्षणशास्त्र विद्याशाखेकरिता त्यांनी तयार केलेला सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा खालीलप्रमाणे

**तक्ता ब**

| विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|
| | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| शिक्षण (बी.एड., बी.पीएड, एम.एड, एम.पीएड, एम.ए. एज्युकेशन इ. पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | ०१ जूलै, २०१५ | ३१ डिसेंबर, २०१५ | २७ जानेवारी, २०१६ | १७ मे, २०१६ |

सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा प्रथमत: विद्या परिषदेसमोर सादर करुन विद्या परिषदेच्या शिफारशी नंतर व्यवस्थापन परिषदेसमोर मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा सर्व सलंग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना म. वि. कायदा १९९४ कलम ३०(r) नुसार प्रथम विद्या परिषदेची शिफारस घेवून व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि, विद्या परिषदेची बैठक दि.१४/०८/२०१५ रोजी संपन्न झाली असून दरम्यानच्या काळात विद्या परिषदेची बैठक लवकर आयोजित होण्याची शक्यता नसल्यामूळे शै. वर्ष २०१५-१६ करीता शिक्षणशास्त्र विद्याशाखेकरीता उपरोक्त तक्ता ब प्रमाणे तयार करण्यात आलेला सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना विद्या परिषदेच्या वतीने मा. कुलगरुमहोदयांनी म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेला शिफारस केलेला आहे.

सबब, शिक्षणशास्त्र विद्याशाखेकरीता शै. वर्ष २०१५-१६ करीता तयार करण्यात आलेला सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना विद्या परिषदेच्या वतीने म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव:** **शिक्षणशास्त्र विद्याशोखकरीता शै. वर्ष २०१५-१६ करीता तयार करण्यात आलेल्या सुधारीत सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या खालील तारखांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

तक्ता ब

| विद्याशाखा | प्रथम सत्र | | द्वितीय सत्र | |
|---|---|---|---|---|
| | प्रारंभ | समाप्ती | प्रारंभ | समाप्ती |
| शिक्षण (बी.एड., बी.पीएड, एम.एड, एम.पीएड, एम.ए. एज्युकेशन इ. पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले) | ०१ जूलै, २०१५ | ३१ डिसेंबर, २०१५ | २७ जानेवारी, २०१६ | १७ मे, २०१६ |

[ ९(११) ] **विद्यार्थ्यांना Offline पद्धतीने देण्यात येणा-या Document Verification करिता आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये वाढ करण्याबाबतची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक व रोजगार विषयक कामासाठी Document Verification ची आवश्यकता भासते. सद्यस्थितीमध्ये सदरची प्रक्रिया ही ऑनलाईन स्वरुपात व पोस्टाद्वारे शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया व रोजगाविषयक सेवा पुरविणाऱ्या विविध कंपन्या अथवा स्वत: विद्यार्थी यांनी विनंती केल्यानंतर पार पाडली जाते. विविध कंपन्यामार्फत Document Verification ची मागणी करण्यात येते यामधील बहुतांश विद्यार्थी विविध कंपनीमध्ये काम करत असतात.

सदरचे विद्यार्थी ज्या कंपनीमध्ये काम करत असतात त्या संबंधीत कंपनीमार्फत सदरच्या विद्यार्थ्यांचे कागदपत्रे पडताळणी करण्याकरिता विद्यापीठाकडे येत असतात. **सद्यस्थितीमध्ये प्रस्तुत विद्यापीठ कागदपत्रांची पडताळणी Offline पद्धतीने करण्याकरिता कमीत कमी रु.२००/- इतके शुल्क आकारत आहे.**

तसेच या सर्व बाबींचा विचार करीता त्वरीत Document Verification देण्याकरिता Truecopy Credential Pvt. Ltd. Pune यांच्याकडून ऑनलाईन कार्यपद्धती विकिसित केलेली असून त्याद्वारे ते विद्यार्थ्यांना Digital Signature द्वारे Document Verification तयार करुन पाठवित आहोत. **सदरच्या Online प्रणालीमधून Document Verification करण्याकरिता रु.१०००/- इतके शुल्क आकारले जाते.**

**विद्यार्थ्यांना Offline पद्धतीने देण्यात येणाऱ्या Document Verification करिता आकारण्यात येणारे शुल्क रु.५००/- इतके करण्याबाबतची परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ).**

ठराव: विद्यार्थ्यांना Offline पद्धतीने देण्यात येणाऱ्या Document Verification करिता आकारण्यात येणाऱ्या रु.२००/- इतक्या शुल्कामध्ये वाढ करुन रु.५००/- इतके शुल्क करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ ९(१२) ] **दि.०४/११/२०१५ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.**

(टिपणी: बांधकाम समिती बैठक दि.०४/११/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडला आहे. परिनियम ३३९ (f) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

३३९ (f)

| |
|---|
| After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Buildings and Works Committee shall be placed before the Management Council for its approval. |

उक्त तरतुदीनुसार दि.०४/११/२०१५ रोजीचा बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृतांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **दि.०४/११/२०१५ रोजीच्या बांधकाम समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ९(१३) ] **श्री. सतिश अनंत नारकर यांना ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटीज् (OSD) या पदावर नियुक्ती देण्याबाबत केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: श्री. सतिश अनंत नारकर वित्त व लेखा अधिकारी नियतवयोमानानुसार दि.३०/०९/२०१५ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने, वित्त व लेखा अधिकारी हे पद जाहिरात प्रसिध्द करुन भरावयाचे किंवा शासनाकडून प्रतिनियुक्तीवर मागणी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या दि.२२/०९/२०१५ रोजीच्या बैठकीत विषय क्र.५ अन्वये विषय सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

| | |
|---|---|
| ठराव क्र.५ | दि. ३०/०९/२०१५ रोजी रिक्त होणारे प्रस्तुत विद्यापीठातील वित्त व लेखा अधिकारी हे संवैधानिक पद जाहिरात प्रसिध्द करुन भरण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात येवून निवड प्रक्रियेतून निवड झालेले वित्त व लेखा अधिकारी रुजू होईपर्यंत किंवा सहा महिने, यापैकी जे अगोदर घडेल ते, या कालावधीसाठी श्री. एस. ए. नारकर यांना पे वजा पेन्शन (Pay - Pension) या वित्तलब्धीवर वित्त व लेखा अधिकारी या पदाचा पदभार देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

या ठरावानुसार श्री. नारकर यांना मुदतवाढ देण्यास परवानगी देण्यासाठी मा. प्रधान सचिव यांना दि.३०/०९/२०१५ रोजी ईमेल केला होता. या संदर्भात कुलसचिवांनी मा. प्रधान सचिव यांच्यासोबत केलेल्या चर्चेनुसार श्री. नारकर यांना सेवानिवृत्तीनंतर मुदतवाढ देण्यापेक्षा विद्यापीठाला त्यांच्या सेवेची गरज असेल तर OSD म्हणून त्यांची नेमणूक करावी व वित्त व लेखा अधिकारी पदाचा पदभार इतर अधिकाऱ्याकडे द्यावा असा सल्ला दिला. त्यानुषंगाने मा. कुलगुरुंनी श्री. सतिश अनंत नारकर यांना व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार पे वजा पेन्शन (Pay - Pension) या वित्तलब्धीवर ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटीज् (OSD) (वित्त व लेखा विभाग) या पदावर नियुक्ती देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार त्यांना दि.०१/१०/२०१५ रोजी नियुक्ती दिली आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या वरील निर्णयानुसार श्री. नारकर यांच्या बाबतीत केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव: **श्री. सतिश अनंत नारकर यांना किमान एका वर्षासाठी किंवा वित्त व लेखा अधिकारी पदावर नव्याने नियुक्त झालेला अधिकारी रुजू होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल तोपर्यंतच्या कालावधीसाठी ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटीज् (OSD) (वित्त व लेखा विभाग) या पदावर पे वजा पेन्शन (Pay - Pension) या वित्तलब्धीवर नियुक्ती देण्याबाबत मा. कुलगुरुंनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

[ ९(१४) ] सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातून एम. एस्सी भाग १ व २ मॅथेमेटिक्स (गणित) मध्ये गुणानुक्रमे नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनी मधून सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "श्री. पी. बी. कामतकर व श्री. प्रविण प. कामतकर सुवर्णपदक" देण्यास व त्याकरिता रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) प्राप्त देणगी स्विकारण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

(टिपणी: श्री. पी. बी. कामतकर, दिशा रिज प्लॉट नं.३०२ पंखा विहिरीजवळ, रेल्वे लाईन, सोलापूर यांनी विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातून एम. एस्सी भाग १ व २ मॅथेमेटिक्स (गणित) मध्ये गुणानुक्रमे नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनीमधून सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "श्री. पी. बी. कामतकर व श्री. प्रविण प. कामतकर सुवर्णपदक" या नावाने सुवर्णपदक देण्यासाठी दि.२६/१०/२०१५ रोजीच्या पत्रासोबत रु.१,००,०००/- (अक्षारी रुपये एक लाख) ची देणगी विद्यापीठास दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला आहे.

व्यवस्थापन परिषेदची बैठक होण्यास काही अवधी असल्याने श्री. पी. बी. कामतकर यांच्याकडून सुवर्णपदक देण्यासंदर्भात विद्यापीठास प्राप्त झालेला रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) चा धनादेश स्विकारण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागास जमा करण्यात आला आहे.

सबब, मा. कुलगुरुमहोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव: श्री. पी. बी. कामतकर यांनी दिलेली रु.१,००,०००/- देणगी स्विकारण्यास व त्याप्रित्यर्थ सोलापूर विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयातून एम. एस्सी भाग १ व २ मॅथेमेटिक्स (गणित) मध्ये गुणानुक्रमे नियमित विद्यार्थी / विद्यार्थीनी मधून सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी "श्री. पी. बी. कामतकर व श्री. प्रविण प. कामतकर सुवर्णपदक" देण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. तसेच या सुवर्णपदकासाठी यापूर्वी तयार केलेली एकत्रित नियमावली लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

**[ ९(१५) ] प्रस्तूत विद्यापीठ परिसरातील शिक्षणशास्त्र संकुलात Distance Education (सुट्टीच्या कालावधील) बी. एड. व एम. एड. अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तूत विद्यापीठ परिसरातील शिक्षणशास्त्र संकुलात सुट्टीतील बी. एड. व एम. एड. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी रितसर एन. सी. टी. ई. भोपाळ या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात मा. कुलगुरुमहोदयांनी दि.०२/११/२०१५ रोजी समिती गठीत केली असून, सदर समितीमध्ये खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्यांच्या नावाचे नामनिर्देशन करण्यात आले.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. श्रीमती वैजयंता पाटील | अध्यक्ष |
| २ | डॉ. ह. ना. जगताप | सदस्य |
| ३ | डॉ. के. जे. शिंदे | सदस्य |
| ४ | डॉ. ए. के. बोंदार्डे | सदस्य |

वरीलप्रमाणे गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०३/११/२०१५ रोजी विद्यापीठाच्या बैठक कक्षात संपन्न झाली असून, सोबत बैठकीचा कार्यवृत्तांत अवलोकनार्थ जोडण्यात आला आहे. सदरच्या बैठकीत मुद्दा क्र.४ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| मुद्दा क्र.४ | Distance Education अंतर्गत बी. एड. आणि एम. एड. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी प्रथमत: व्यवस्थापन परिषद / अधिसभा / विद्या परिषदेत विषय ठेवून मान्य करुन घ्यावे तसेच सदरचा ठराव प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३०(२) (क) मध्ये पदवी, पदविका, प्रमाणपत्रे व इतर विद्याविषयक विशेषोपाधी सुरु करण्यासंबंधी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे अशी तरतूद आहे.

वरीलप्रमाणे महराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील तरतूद विचारात घेता Distance Education अंतर्गत बी. एड. आणि एम. एड. अभ्यासक्रम विद्यापीठ परिसरात सुरु करण्यासाठी प्रथम विद्या परिषदेमध्ये विषय ठेवून त्यास व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची तरतूद आहे. परंतु सध्या नजिकच्या कालावधीमध्ये विद्या परिषदेच्या बैठकीचा नियोजित दिनांक ठरलेला नसल्यामूळे सदर प्राधिकरणाच्या वतीने तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिली आहे.

सोलापूर जिल्ह्याची लोकसंख्या विचारात घेता Distance Education अंतर्गत बी. एड. आणि एम. एड. अभ्यासक्रम विद्यापीठ परिसरात सुरु करणे खूप गरजेचे असून त्याचा लाभ सेवेतील कर्मचारी वर्गात खूप मोठ्या प्रमाणात होणार आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१७ साठी सोलापूर जिल्ह्यातील जवळ जवळ ७०० प्राथमिक शिक्षकांनी प्रवेश घेण्यासाठी अर्ज केलेला होता. त्यापैकी फक्त ४५ शिक्षकांनाच प्रवेश मिळाला असून

उर्वरित जवळपास ६५० शिक्षक प्रवेशापासून वंचित आहेत. राज्यातील अन्य अकृषि विद्यापीठात देखील अशा स्वरुपाचा अभ्यासक्रम सुरु आहे. त्यामूळे त्या धरतीवर प्रस्तूत विद्यापीठात देखील सदरचा अभ्यासक्रम सुरु झाल्यास पुरेशाप्रमाणात विद्यार्थी संख्या मिळण्यास काहीच अडचण भासणार नाही.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(खख) मध्ये विद्या परिषदेकडून आलेल्या विद्याविषय कार्यक्रमांच्या प्रस्तावाची व्यवहार्यता निर्धारित करणे व त्यांना मान्यता देणे अशा स्वरुपाची तरतूद आहे.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ मधील तरतूद विचारात घेता प्रस्तूत विद्यापीठ परिसरातील शिक्षणशास्त्र संकुलता Distance Education (सुट्टीच्या कालावधीमधील) बी. एड. व एम. एड. अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **प्रस्तूत विद्यापीठ परिसरातील शिक्षणशास्त्र संकुलात Distance Education (सुट्टीच्या कालावधीतील) बी. एड. व एम. एड. अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत विद्या परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
सचिव
व्यवस्थापन परिषद

सही/-
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद